दै. पुण्यनगरी दि. 19.10.25

# दीड वर्षांपूर्वी घरातून निघून गेलेल्या मुलीला पंजाबमधून आणले

**नांदेड/ प्रतिनिधी**

किनवट तालुक्यातील इस्लापूर परिसरातील रहिवासी असलेल्या अल्पवयीन मुलीला पळवून नेण्यात आले होते. या प्रकरणी तिच्या पालकांनी दिलेल्या माहितीनुसार पोलिसांनी गुन्हा नोंद करुन तपास केला आणि पंजाबमधून या अल्पवयीन मुलीला गावाकडे आणण्यात यश मिळविले.

किनवट तालुक्यातील एका कुटुंबातील अल्पवयीन मुलगी आईसोबत वाद झाल्याने मे २०२४ मध्ये घरातून निघून गेली होती. तेव्हा ती १७ वर्षांची होती. तिचा तेव्हा नातेवाईक व परिचितांकडे शोध घेतला तरीही ती सापडली नाही. त्यामुळे तिच्या पालकांनी दि.२८ मे २४ रोजी इस्लापूर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यानुसार इस्लापूर पोलिसांनी या अल्पवयीन मुलीच्या अपहरणाचा गुन्हा दाखल केला होता. तब्बल दीड वर्षानंतर म्हणजे ऑक्टोबर २५ मध्ये इस्लापूर पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे व तांत्रिक विभागाच्या सहाय्याने या अल्पवयीन मुलीचा शोध घेतला. तिच्या लोकेशननुसार इस्लापूर पोलिसांचे पथक पंजाबमधील भूल्ला जि.गुरुदासपूर या गावी जावून तिचा शोध घेत तिला ताब्यात घेतले. दीड वर्षानंतर या मुलीला फिर्यादी वडिलांच्या ताब्यात देण्यात इस्लापूर पोलिसांना यश आले.

या प्रकरणी इस्लापूर पोलिस ठाण्यात गुरनं ४७/२४ कलम ३६३ दाखल करण्यात आला होता. या प्रकरणी पोलिस अधीक्षक, अपर पोलिस अधीक्षक, उपविभागीय पोलिस अधिकारी किनवट यांच्या मार्गदर्शनात इस्लापूरचे सपोनि उमेश भोसले, श्रेणी पोउपनिरीक्षक कोमल कागणे, पोकाँ पोकॉ गजानन नागरगोजे, पोकाँ ओमप्रकाश डिडेवार यांनीमिशन निर्भया अंतर्गत पळून गेलेल्या अल्पवयीन मुलीला परराज्यातून सुखरुप गावी आणण्यात यश मिळविले.